# शिवाजी विद्यापीठ ३८ व्या युवा महोत्सवात विवेकानंदची बाजी

## *विवेकानंदची जनरल चॅम्पियनशोपची ११ वर्षाची परंपरा कायम*

कोल्हापूर दि. ३ :शिवाजी विद्यापीठाचा ३८ वा मध्यवर्ती युवा महोत्सव विलिंग्डन कॉलेज, सांगली येथे नुकताच संपन्न झाला, या युवा महोत्सवामध्ये विवेकानंद कॉलेजने सांघिक व वैयक्तिक कलाप्रकारात यश प्राप्त करुन सर्वसाधारण विजेतेपदाची (जनरल चॅम्पियनशीप) प्राप्त केली आणि सातत्यपूर्ण ११ वर्षाची यशाची परंपरा कायम राखली आहे.

या युवा महोत्सवामध्ये विवेकानंद कॉलेजने पाश्चिमात्य समूह गीत प्रथम क्रमांक, सांघिक रचनाकृती-व्दितीय, सुगम गायन-तृतीय, शास्त्रीय सूरवाद्य- प्रथम, व्यंगचित्रण-तृतीय, रांगोळी तृतीय, पाश्चिमात्य एकल वाद्य वादन-प्रथम, एकांकिका प्रथम, लघुनाटिका-प्रथम लोकनृत्य-तृतीय, लोकसंगीतवाद्यवृंद-तृतीय, भारतीय समूहगीत-व्दितीय इत्यादी कलाप्रकारात यश प्राप्त करत सांघिक सर्वसाधारण विजेतेपदाचा अभिजीतदादा कदम फिरता चषक प्राप्त केला. वैयक्तिक स्पर्धामधील सर्वाधिक पारितोषिके विवेकानंदने प्राप्त केली. विजेत्या स्पर्धकाना महाराष्ट्राचे सहकारमंत्री व सांगली जिल्हयाचे पालकमंत्री सुभाष देशमुख, खासदार संजय पाटील यांचे हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे व संस्थेच्या सचिवा मा. प्राचार्या सौ. शुभांगी गावडे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.वाय.होनगेकर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी व सांस्कृतिक विभागातील प्राध्यापकांचे अभिनंदन केले. यावेळी प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, विद्यार्थ्यांनी अत्यंत कष्ट व जिद्दीतून युवा महोत्सवामध्ये आपल्या अंगीभूत असलेल्या कलागुणांचे सादरीकरण करुन कडवी झुंज देऊन विजयश्री खेचून आणली व विवेकानंदच्या नावलौकिकास साजेसे यश प्राप्त करुन दिले. ही यशाची परंपरा त्यांनी अखंडित राखली. यामुळे संस्थेच्या नावलौकिकात भर पडली आहे .

संस्थेच्या सचिव प्राचार्या सौ शुभांगी गावडे यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक केले. त्या म्हणाल्या, विवेकानंद कॉलेज शिक्षण, कला, क्रीडा क्षेत्राबरोबरच सांस्कृतिक कलागुणांतही अग्रेसर राहिले आहे. शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांचा ज्ञानवारसा जपणारी ही युवापिढी भविष्यातही असेच उज्ज्वल यश प्राप्त करीत राहील असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस वाय होनगेकर म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी वर्षात मिळवलेले हे सर्वसाधारण विजेतेपदाचे यश निश्चितच प्रेरणादायी आहे. विद्यार्थी, सांस्कृतिक विभाग, श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेच्या बहुमोल सहकार्यामुळे हे यश प्राप्त झाले आहे.

यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.ए.एस.महात, डॉ.मंजुश्री घोरपडे, प्रा वर्षा पवार, प्रा.महेश हिरेमठ, प्रा संजय अंकुशराव, प्रा एच व्ही चामे, प्रा बी के गोसावी, प्रा संदीप पाटील, प्रा.प्रदीप पाटील, प्रा विकास मस्के, प्रा.नंदकुमार रानभरे व प्रशासकीय कर्मचारी यानी विद्यार्थ्यांसाठी विशेष परिश्रम घेऊन त्यांना प्रोत्साहित केले.

---



